"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड : उत्पन्न व खर्चाचा विश्लेषणात्मक अभ्यास"

- **प्रस्तावना :**

संपूर्ण देशामध्ये शिक्षण क्षेत्राच्या बाबतीत विद्यापीठाचे स्थान हे अत्यंत महत्त्वपूर्ण असून दरवर्षी देशातील अनेक विद्यापीठातून लाखो विद्यार्थी घडत असतात. त्यामुळे विद्यापीठाची जडण घडण ही तेवढीच महत्त्वपूर्ण मानली जाते.

भारतात विद्यापीठाची एकूण संख्या ७११ इतकी आहे. त्यापैकी महाराष्ट्रात विद्यापीठाची संख्या २१ इतकी आहे. महाराष्ट्र राज्यातील नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे सध्याच्या वर्तमान स्थितीत शैक्षणिक गुणवत्तेच्या दर्जाबाबत एक अग्रगण्य विद्यापीठ म्हणून नावारुपास आलेले आहे. या विद्यापीठाची स्थापना १९९४ साली झालेली आहे. मराठवाडयाचे प्रथमतः मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाचे नाव परिवर्तन होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद असे करण्यात आले. हे विद्यापीठ औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, नांदेड, लातूर, उस्मानाबाद आणि हिंगोली या जिल्हयासाठी कार्यरत होते परंतु कालांतराने विद्यार्थी वर्गाची वाढती मागणी लक्षात घेवून मराठवाडयामध्ये दुसरे विद्यापीठ म्हणून नांदेडला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ सुरुवात करण्यात आले. या विद्यापीठातंर्गत नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली या चार जिल्हयातील महाविद्यालये अनुदानित व विनाअनुदानित अशी ३७० महाविद्यालये जोडण्यात आलेली आहेत. तर दरवर्षी या विद्यापीठावर सरासरी लाखो विद्यार्थ्यांचा भार पडतो आहे. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे एकूण शैक्षणिक कार्य, परीक्षा पध्दती, विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क गोळा करणे, विद्यापीठांतर्गत वेगवेगळया संकुलासाठी विषयनिहाय अभ्यासक्रमाची अमलबजावणी करणे त्यासाठी -नव नविन योजना राबविणे, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशाप्रमाणे वेगवेगळे अभ्यासक्रम चालविणे, विद्यापीठाचे उत्तम दर्जाचे प्रशासन चालविण्यासाठी विविध उत्पन्नाचे स्त्रोत शोधणे, तसेच त्या स्त्रोतातून खर्चाचे नियोजन करणे हा एक महत्वपूर्ण अभ्यास आहे. कोणत्याही विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणाचे अभ्यासक्रम राबविले जातात. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अखत्यारीत विद्यापीठांना काम करावे लागत असते. म्हणूनच विद्यापीठ अनुदान आणि विद्यापीठ यामध्ये सम-वय राखण्यासाठी विद्यापीठास उत्पन्न आणि खर्चाचा मेळ घालावा लागतो.

- **संशोधन विषय निवडीचे महत्त्व :**

उच्च शिक्षणामध्ये विद्यापीठाचे योगदान हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ते सर्वच घटकांशी निगडीत असते. त्यामध्ये विद्यार्थी हा केंद्र बिंदू असतो तर पालक, शिक्षक, संस्था व समाज हे ही घटक विद्यापीठाशी निगडीत असतात. म्हणूनच विद्यापीठाच्या उत्पन्न आणि खर्चाचा अभ्यास करणे अतिशय महत्त्वपूर्ण ठरते.

संपूर्ण देशामध्ये व तसेच महाराष्ट्रामध्ये प्रादेशिकतेवर आधारीत अनेक विद्यापीठे स्थापन झालेले आहेत, परंतु मराठवाडयातील नांदेड येथील स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ हे शैक्षणिक गुणवत्तेत पुढारलेले असल्यामुळे विद्यापीठात उत्पन्न आणि खर्च, अडचणी, समस्या व त्यातील उपाय योजना याचा शोध घेणे आवश्यक असल्यामुळे मी संशोधक म्हणून **"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड : उत्पन्न व खर्चाचा विश्लेषात्मक अभ्यास"** हया विषयाची निवड केलेली आहे.

- **संशोधनाचे उदिष्टे :**

विद्यापीठाला महाविद्यालयाबरोबरच विद्यापीठाच्याही आर्थिक कारभाराकडे लक्ष दयावे लागते व त्यासाठी विद्यापीठासमोर येणाऱ्या आर्थिक अडचणी, समस्या उपाययोजना व प्रगतीचा आढावा घेण्यासाठी पुढील उदिष्टे समोर ठेवून संशोधनाचे कार्य पूर्ण केले जाईल.

१. विद्यापीठाचे उत्पन्नाचे स्त्रोत अभ्यासणे.

२. विद्यापीठाच्या खर्चाचा अभ्यास करणे.

३. विद्यापीठाच्या परीक्षेची शुल्क आकारणी, परीक्षेचा खर्च व अन्य खर्चाचे विश्लेषण करणे.

४. विद्यापीठातील खर्चाच्या बचतीसाठीच्या उपाययोजनाचा अभ्यास करणे.

५. विशेष संदर्भ म्हणून विद्यापीठ परिनियम व विद्यापीठ नियमन यांची सांगड घालणे.

६. निषर्ष व शिफारशी सूचविणे.

- **संशोधनाची गृहितकृत्ये :**

संशोध जेंव्हा विषयाची निवड करतो म्हणजेच त्या संबंधीत विषयाबाबत थोडीफार माहीती असते. म्हणून त्या आधारावर काही अंदाज बांधता येतो त्यामुळे त्याला एक निश्चित मार्गाने जाण्याचा मार्ग सापडतो. म्हून मी सुध्दा याच पध्दतीने प्रस्तूत संशोधनात काही गृहितके पुढील प्रमाणे मांडली आहेत.

१. विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य सरकार यांच्या कडून वित्तीय सहाय्य मिळते.

२. विद्यापीठ स्वंय उत्पन्नाचे स्त्रोत तयार करते.

३. विद्यापीठ सामाजिक व शैक्षणिक बाबीवर खर्च करते.

४. विद्यापीठाला खर्च्यासाठी निधी अपूरा पडतो.

५. विद्यापीठाने स्वंय उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केल्यास विद्यापीठ अर्थक्षम बनू शकते.

- **तथ्य संकलन :**

"स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड : उत्पन्न व खर्चाचा विश्लेषणात्मक अभ्यास" या विषयाच्या संशोधनासाठी आवश्यक तथ्य पुढील स्त्रोताच्या साहाय्याने संकलित केली जाणार आहेत.

अ) प्राथमिक तथ्य संकलन

१. प्रत्यक्ष निरीक्षण :

विद्यापीठातील वे□वे□ळया विभागात भेट देवून प्रत्यक्ष निरीक्षण करणे व आकडेवारी आणि माहिती गोळा □र□.

२. प्रश□ावली :

१. विद्यापीठाशी निगडीत असलेल्या बाबीशी प्रश्नावली तयार करणे.

२. कर्मचाऱ्यासाठी प्रश्नावली तयार करणे.

३. मुलाखत :

विद्यापीठाशी संबंधीत असलेल्या वेगवेगळया पदाधिकारी, विभागप्रमुख, संकूलनातील प्रोफेसर, □र्मचारी, विद्यार्थी यांच्या मुलाखती घेणे.

ब) दुय्यम तथ्य संकलन:

विद्यापीठ अनुदान आयोगाने व विद्यापीठाने प्रकाशीत केलेले मासिके, नियतकालिके, वार्षीक अहवाल, अंकेक्षण अहवाल, संदर्भ ग्रंथ, संशोधकाचे प्रकाशित अहवाल, विविध वेबसाईडस् इत्यादीव्दारे माहिती संकलन □र□.

- **नमुना निवड :**

प्रस्तूत संशोधन विषयाकरीता संशोधनाचा हेतू लक्षात घेवून नमुना निवड तंत्राच्या आधारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील पदाधिकारी (अभ्यास मंडळे) विभागप्रमुख (संकुल), निवडक महाविद्यालये, □र्मचारी, विद्यार्थी वर्ग यांची नमुना निवड पुढील प्रमाणे केली आहे.

अ.क्र.	विद्यापीठाचे घटक	निवड प्रमाण अ	एकूण कार्यक्षेत्र ब	एकूण निवडलेले प्रमाण अ x ब
१.	पदाधि□ारी (अभ्यासमंडळे)	१०	१	१०
२.	विभा□ प्रमु□ (सं□ल)	१४	१	१४
३	□र्मचारी (संकूल)	१४	१	१४
४	महाविद्यालये	१०	४	४०
५	विद्यार्थी (सं□ल)	१४	२	२८
	एकूण			१०६

- **तथ्य विश्लेषण :**

तथ्य विश्लेषणासाठी प्रस्तूत संशोधन विषयामध्ये Mean, Standard deviation, Chi- squre test, Co- relation analysis, अशा विविध सांख्यिकीय तंत्राचा वापर spss या सांख्यिकी आज्ञावलीच्या माध्यमातून □ला जाईल व त्याआधारेच संशोधनाचे निष्कर्ष काढले जातील.

- **संशोधनाची व्याप्ती :**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संबंधीत महाविद्यालये, विद्यापीठ संकुले, पदाधिकारी, विभागप्रमुख, कर्मचारी, विद्यार्थी या संबंधीत संशोधनाची व्याप्ती राहील. व्याप्तीचा कालावधी म्हणून २०११-१२ ते २०१५-१६ ही पाच वर्ष निवडली आहेत.

- **संशोधनाची मर्यादा :**

प्रस्तूत संशोधन कार्य पुढील मर्यादेच्या चौकटीत राहून केले जाईल.

१. संशोधन कार्य हे संपूर्णतः नांदेड विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रापूरतेच मर्यादीत राहील.

२. संशोधन □ार्य हे नियमावलीच्या आधीन राहूनच पूर्ण केले जाईल.

- **संशोधनाची उपयुक्तता :**

प्रस्तूत संशोधन विषय हा वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र, अर्थशास्त्र या दोन्ही शाखेमध्ये उपयोगी ठरणार आहे. शिवाय हे संशोधन यु.जी.सी. विभाग, राज्यसरकार विभाग, संशोधक, प्राध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांना देखील उपयुक्त ठरणार आहे.

- **संशोधन अहवाल रचना :**

संपूर्ण संशोधन कार्याचे लिखित व समग्र विवरण म्हणजे संशोधन अहवाल होय. सदर संशोधन विषयाची माहिती गोळा केल्यानंतर ती माहिती पुढील प्रकारणाव्दारे वर्गीकृत करण्यात येईल.

- **१. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची संपू□ पाश्वभूमी.**
  - १.१ विद्यापीठाचा इतिहास.
  - १.२ विद्यापीठाची ओळख व स्थान.
  - १.३ विद्यापीठाचे ऐतिहासिक व भौगालिक महत्त्व.
- **२. संशोध□ प्र□ाली.**
  - २.१ संशोधनाची संकल्पना.
  - २.२ संशोधनाची उदिष्टे व गृहितकृते.
  - २.३ संशोधनाची व्याप्ती व तथ्य संकलन.
  - २.४ संशोधनाचे महत्व.
  - २.५ नमुना निवड व तक्ते विश्लेषण.
  - २.६ संशोधनातील अडचणी.
- **३. विद्यापीठाचे उत्पन्नाचे स्त्रोत.**
  - ३.१ महाविद्यालये व महाविद्यालयातील विद्यार्थी सं□या.
  - ३.२ अभ्यासक्रमाची संख्या व फी संकलन.
  - ३.३ यू.जी.सी. अंतर्गत वेगवेगळया अनुदानाच्या योजना.
  - ३.४ विद्यापीठाला राज्यसरकारकडून मिळणारे अर्थसहाय्य व योजना.
  - ३.५ परी□ा शुल□.
  - ३.६ शि□□ शुल□.
  - ३.७ इतर शुल्क.
  - ३.८ विद्यापीठ प्रकाशनाची विक्री.
  - ३.९ दुरशि□□ विभा□.

- **४.विद्यापीठाव्दारे करण्यात येणारे खर्च.**

  ४.१ वेतनावरील खर्च.

  ४.२ परी□ा □र्च.

  ४.३ शै□णि□ □र्च.

  ४.४ सामान्य सेवा आणि सामा-य शुल□.

  ४.५ विद्यापीठ पुरक सेवा आणि बांधकाम विभाग.

  ४.६ विद्यापीठातील संकुलावरील खर्च.

  ४.७ विद्यापीठातील विभागावरील □र्च.

  ४.८ विद्यार्थी कल्याण आणि इतर □र्च.

  ४.९ विद्यापीठ अनुदान मंडळ-आवर्ती □र्च.

  ४.१० इंटरनेट, वायफाय, टपाल यावरील खर्च.

  ४.११ ग्रंथालयावरील खर्च.

  ४.१२ याशिवाय होणारे सर्व खर्च.

- **५. उत्पन्न व खर्चाचे आर्थिक विश्लेषण.**

  ५.१ विद्यापीठातील उत्पन्नाचे विश्लेषण.

  ५.२ विद्यापीठातील खर्चाचे विश्लेष□.

  ५.३ वितरण खर्चाचे विश्लेषण.

  ५.४ फी आकारणीचे विश्लेषण.

  ५.५ उत्पन्नाचा खर्चाशी असणारा संबंध.

- **६. □िष□र्ष व शिफारशी.**

  ६.१ उदिष्टयाचे मूल्यमापन.

  ६.२ गृहितकृत्याची पडताळणी.

  ६.३ -िष□र्ष.

  ६.४ शिफारशी.

- **संदर्भ ग्रंथसुचि :**

१. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४- संचालक,शासन मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४ यांच्याव्दारे प्रकाशित- २००५

२. प्रगत सामाजिक संशोधन पध्दती व सांख्यिकी-प्रा.डॉ. दिलीप खैरनार-डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-फेब्रुवारी २००९.

३. व्यवस्थापनाची मुलतत्त्वे-२००१ प्रभाकर देशमुख

४. विद्यापीठाचे वार्षीक अहवाल.

५. विद्यापीठाचे अंकेक्षण अहवाल.

६. विद्यापीठाचे पब्लिकेशन्स.

७. संशोधकाचे संशोधित साहित्य.

८. संशोधनाशी संबंधीत वेबसाईटस्.

संशोधक ,
श्री □रहीरे रमेश □□राम,
एम.कॉम., बी.एड., जी.डी.सी.अँड ए.
कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी.

मार्गदर्शक ,
डॉ. एस. एस. जाधव,
एम.कॉम., पी.एचडी., डी.बी.एम.
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,
धर्माबाद. जि. नांदेड.